# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 20/10/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावरील बी.के.सी.पी. शाळेसमोर रेल्वे फाटक जवळ येथे दिनांक 19/10/2021 चे 04.00 वा. ते 04.35 वा. दरम्यान कन्हान पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना एका कथ्या रंगाचे स्कॉरपीयो गाडीवर संशय आल्याने यातील स्कॉरपीयो वाहनाचे चालकाने त्याचे वाहन भरघाव वेगाने पळवुन नेत असता बी.के.सी.पी. शाळेसमोर रेल्वे फाटक जवळ रेल्वे गेट बंद असल्याने सदर स्कॉरपीयो चालक वाहन सोडुन पळुन गेला. सदर वाहनाची तपासनी केली असता नमुद स्कॉरपीयो गाडी क्र. एम.एच 31/सि.आर– 8199 मध्ये 1 बैल, 5 गाय असे एकुण 6 गौवंश अत्यंत कुर व निर्दयतेने कोंबुन व आखुड दोरखंडाने बांधुन आरोपीने कत्तलीकरीता वाहतुक करून घेउन जातांनी मिळुन आले. घटनास्थवरून एकुण 6 गोंवश (बैल,गाय)किं. 60,000/–रू. व स्कॉरपीयो गाडी क्र. एम.एच 31/सि.आर. 8199 किं. 2,00,000/–रू. असा एकुण 2,60,000/–रू. चा मुदेमाल जप्त करून ताब्यात घेण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोशि मंगेश सोनटक्के, पो.स्टे. कन्हान यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 11 (1)11(1)(ए),11(1)(डी),11(1)(ई)11(1)(एफ)11(1)(आय) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा 5ऐ,5बी,9, महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम 184 मोवाका तसेच कलम 429 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण सहारे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. वियजकुमार मगर, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री विलास काळे, सफौ अमर भलावीकर, पोना संदीप गेडाम व पोशी मंगेश सोनटक्के यांनी केलेली आहे.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर